आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२३ जून २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- नीट यूजी पेपरफुटी प्रकरणी सीबीआयकडून गुन्हा दाखल
- १८ व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन उद्यापासून, २६ जून रोजी होणार सभापतीपदाची निवडणूक
- केंद्र सरकार पूरव्यवस्थापनात शून्य जीवितहानी हे उद्दिष्ट ठेवून पुढं जात असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन
- भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्रोनं पुष्पक या अग्निबाणाचं केलं तिसऱ्यांदा यशस्वी परीक्षण

  **आणि**

- भारताच्या महिला क्रिकेट संघाचा तिसऱ्या आणि अखेरच्या एकदिवसीय सामन्यात दक्षिण आफ्रिकेवर ७ खेळाडू राखून विजय

**<><><><><>**

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या नीट-यूजी परीक्षेत अतिरिक्त गुण मिळालेल्या सर्व एक हजार ५६३ विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा आज घेण्यात आली. राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या उच्चस्तरीय समितीच्या अहवालावर सर्वोच्च न्यायालयानं नोंदवलेल्या निरीक्षणांच्या आधारे या विद्यार्थ्यांना दिलेले अतिरिक्त गुण रद्द करून फेरपरीक्षेचा निर्णय घेतल्याचं राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं म्हटलं आहे. ज्या विद्यार्थ्यांना फेरपरीक्षा द्यायची नसेल, त्यांना अतिरिक्त गुणांविना मिळालेले गुण ग्राह्य धरले जातील, असंही संस्थेनं स्पष्ट केलं आहे.

**<><><><><>**

नीट यूजी पेपरफुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने केलेल्या तक्रारीनंतर सीबीआय अर्थात केंद्रीय अन्वेषण संस्थेने गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी देशभरात दाखल झालेल्या गुन्ह्यांचा तपास हाती घेण्यासाठी सीबीआय पावलं उचलत आहे. नीट यूजी परीक्षेतल्या अनियमिततेचं प्रकरण काल केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने सीबीआयकडे सोपवलं होतं. परीक्षेचं पावित्र्य अबाधित राखण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या हिताचं रक्षण करण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे. तसंच या प्रकरणात दोषी असणाऱ्यांविरोधात कडक कारवाई केली जाईल, असं शिक्षण मंत्रालयाने सांगितलं.

दरम्यान, याच प्रकरणात दहशतवादविरोधी पथक-एटीएसच्या नांदेड शाखेने दोन शिक्षकांना चौकशीसाठी ताब्यात घेतलं असून, त्यांचा या पेपरफुटी प्रकरणी काही संबंध आहे का, याचा तपास केला जात असल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<><><><><>**

१८ व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन उद्यापासून सुरू होणार आहे. अधिवेशनादरम्यान नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी होईल. लोकसभेचे हंगामी सभापती ज्येष्ठ भाजप खासदार भर्तृहरी महताब हे नवनिर्वाचित खासदारांना शपथ देतील. लोकसभा सभापती पदासाठी येत्या २६ जून रोजी निवडणूक होणार आहे. राज्यसभेचं अधिवेशन येत्या २७ तारखेला सुरू होणार आहे. त्याच दिवशी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं अभिभाषण दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीसमोर होईल. हे अधिवेशन ३ जुलैपर्यंत चालेल.

**<><><><><>**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर देशभरात आपत्ती व्यवस्थापनाच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय बैठक आज नवी दिल्ली इथं झाली. पुराचं व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने दूरगामी धोरण तयार करण्यासंदर्भातही बैठकीत चर्चा झाली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सरकार शून्य जीवितहानी हे उद्दिष्ट ठेवून पुढं जात असल्याचं शहा यांनी सांगितलं.

इस्त्रोने दिलेल्या उपग्रह चित्रांचा आणि इतर माहितीचा अचूक वापर आणि बचावाच्या दृष्टीनं उपलब्ध साधनसामुग्रीचा सुयोग्य वापर केला पाहिजे असं शहा म्हणाले. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने वेळोवेळी जारी केलेल्या सूचनांची अंमलबजावणी वेळच्या वेळी करण्याचं आवाहन त्यांनी सर्व राज्य सरकारं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनांना केलं. ठिकठिकाणच्या धरणांचे दरवाजे सुस्थितीत असल्याची खातरजमा करण्याचे निर्देश गृहमंत्र्यांनी केंद्रीय जल आयोगाला दिले. हवामान, पाऊस, अतिवृष्टी, पूर,विजांचा कडकडाट यासंदर्भातले इशारे दूरचित्रवाहिन्या, एफ एम रेडियो आणि एसएमएसद्वारे जनतेपर्यंत पोचवावे असं त्यांनी हवामानशास्त्र विभागाला सांगितलं. केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील आणि गृह राज्य मंत्री नित्यानंद राय तसंच विविध विभागांचे वरिष्ठ सरकारी अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

देशात फौजदारी कायद्यासंदर्भात करण्यात येणाऱ्या सुधारणांबाबत एक चर्चासत्र आज चेन्नईत झालं. भारतीय न्याय संहिता, भारतीय साक्ष्य अधिनियम, आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहिता या तीन नवीन कायद्यांची अंमलबजावणी येत्या १

जुलैपासून होणार असून त्यासंदर्भात प्रबोधन करण्यासाठी हे चर्चासत्र झालं. केंद्रीय कायदेमंत्री अर्जुन राम मेघवाल यांचं भाषण चर्चासत्रात झालं.

भारतीय दंड संहितेसारखे कायदे वसाहतवादी ब्रिटिश सरकारने केवळ भारतीयांना शिक्षा देण्यासाठी बनवले होते. आता सर्व राज्य सरकारं, केंद्रशासित प्रदेशांची प्रशासनं, तसंच सर्वोच्च आणि उच्च न्यायलयांमधले न्यायाधीश आणि इतर तज्ञांबरोबर सल्ला मसलत करुन हे बदल करण्यात आले आहेत, असं ते म्हणाले. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल मुरुगन यांचं ही भाषण यावेळी झालं. देशभरातले तज्ञ वकील, न्यायाधीश, तसंच कायद्याचे विद्यार्थी चर्चासत्राला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**<><><><><>**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्रोनं आज पुष्पक या अग्निबाणाचं तिसऱ्यांदा यशस्वी परीक्षण केलं. कर्नाटकच्या चित्रदुर्ग एअरोनॉटिकल टेस्ट रेंज एटीआर इथे हे परीक्षण झालं. आज सकाळी ७ वाजून १० मिनिटांनी वायू सेनेच्या चिनुक हेलिकॉप्टरमधून पुष्पकला ४ पूर्णांक ५ दशांश किलोमीटर उंचीवरून सोडण्यात आलं. प्रक्षेपणानंतर अर्ध्या तासाने हे यान युद्धसराव पूर्ण करून स्वयंचलित पद्धतीनं पुन्हा धावपट्टीवर उतरलं.

**<><><><><>**

आज जागतिक ऑलिंपिक दिन आहे. जगभरात खेळ आणि शारीरिक कसरतींना प्रोत्साहन देण्यासाठी १९४८ पासून हा दिवस साजरा केला जातो.  ‘पुढे चला आणि साजरा करा’ असं यंदाच्या ऑलिंपिक दिनाचं घोषवाक्य आहे.

युवा आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांनी जागतिक ऑलिंपिक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. एकता आणि शांततेला प्रोत्साहन देण्यासाठी खेळाच्या ऊर्जेचा वापर करायला हवा असं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

दरम्यान, महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री आणि महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांनीही ऑलिम्पिक दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. खेळाच्या माध्यमातून समाजात एकता, समता आणि बंधुता रुजवणं गरजेचं असल्याचं ते म्हणाले. तर राज्याचे क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी खेळामध्ये मुला मुलींना समान संधी देण्यास प्राधान्य दिलं जाईल, असं म्हटलं आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतला शेवटचा सामना आज बंगळुरूच्या चिन्नास्वामी मैदानावर सुरु आहे. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ८ बाद २१५ धावा केल्या.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारतानं ३५ षटकात ३ बाद १८८ धावा केल्या होत्या.

**<><><><><>**

टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज बार्बाडोस इथं सूपर एट फेरीच्या दुसऱ्या गटात इंग्लंड आणि अमेरिका यांच्यात सामना सुरू आहे. या सामन्यात इंग्लंडनं नाणेफेक जिकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. या फेरीतला दोन्ही

संघांचा हा अखेरचा सामना असून, उपांत्य फेरीत प्रवेश करण्याच्या आशा जिवंत ठेवण्यासाठी या सामन्यात विजय मिळवणं इंग्लंडसाठी महत्वाचं असणार आहे.

**<><><><><>**

बहुजन समाजवादी पक्षाच्या अध्यक्षा मायावती यांनी आज आकाश आनंद यांना आपला राजकीय वारस घोषित केलं आणि त्यांना राष्ट्रीय समन्वयक पदाची जबाबदारी दिली. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीच्या निकालांच्या पार्श्वभूमीवर मायावती यांनी पक्ष पदाधिकाऱ्यांची आज लखनऊ इथं आढावा बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी हा निर्णय जाहीर केला.

**<><><><><>**

पश्चिम बंगाल पोलिसांच्या विशेष कृती दलानं पश्चिम बर्धमान जिल्ह्यातून एका विद्यार्थ्यासह पाच जणांना अटक केली आहे. या सहा जणांचा बांग्लादेशातल्या शहादते अल हिक्मा या दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. यांपैकी एक विद्यार्थी कॉम्प्युटर सायन्स विषयाच्या दुसऱ्या वर्षात शिकत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्याने दिलेल्या माहितीवरूनच अन्य पाच जणांना अटक झाली असून सर्वांवर बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सर्वांना दुर्गापूर इथल्या न्यायालयानं, विशेष कृती दलाची १४ दिवसांची कोठडी सुनावली आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात माओवाद्यांनी घडवून आणलेल्या आयईडी स्फोटात कोब्रा पथकाच्या दोन जवानांचा मृत्यू झाला आहे. सुरक्षा दलांचे जवान

सिलगेर इथल्या छावणीतून टेकलगुडेम इथल्या छावणीच्या दिशेने जात असताना दुपारी तीनच्या सुमाराला हा स्फोट झाला. याबाबतच्या अधिक तपशीलांची प्रतीक्षा आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या प्रस्तावित वाढवण बंदराला स्थानिक रहिवाश्यांकडून  तीव्र विरोध होत आहे. वाढवण बंदराविरोधातल्या याचिका सर्वोच्च न्यायालय तसं हरीत प्राधिकरणाकडे असतानाही केंद्रीय मंत्रीमंडळाने बुधवारी वाढवण बंदर विकास योजनेला मंजूरी दिली. याला विरोध म्हणून वाढवण बंदर विरोधी कृती मोर्चाने निदर्शनं करत केंद्रसरकारचा पुतळा जाळला. बंदर विकासामुळे मासेमारी तसंच या भागातली शेतीही धोक्यात येईल म्हणून  पालघरसह  मुंबई, दहाणू,वसई, विरार, तलासरी इथल्या भूमीपुत्रांचा वाढवण बंदर विकास योजनेला विरोध आहे.

**<><><><><>**